# महाराष्ट्र शासन
# नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण

मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, नाशिक रोड, नाशिक - 422101
दुरध्वनी क्र. 0253-2461909 Email- kumbhmela.2027@mah.gov.in

प्रति,

1. मा. जिल्हाधिकारी, नाशिक.
2. मा. विभागीय रेल्वे प्रबंधक, भुसावळ.
3. मा.पोलीस आयुक्त, नाशिक शहर.
4. मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक.
5. मा.महानगर आयुक्त, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक.
6. मा.आयुक्त, महानगरपालिका, नाशिक.
7. मा.पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण.
8. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक.
9. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, देवळाली कंन्टोंमेंट, नाशिक.
10. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक.
11. प्रकल्प संचालक, भारतीय राजमार्ग प्राधिकरण, नाशिक.
12. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, नाशिक
13. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कं. मर्या., नाशिक शहर/ ग्रामीण.
14. अधिक्षक अभियंता (लाभक्षेत्र विकास), जलसंपदा विभाग, नाशिक.
15. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नाशिक.
16. कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक
17. जिल्हा शल्यचिकित्सक, नाशिक.
18. उपवनसंरक्षक, पश्चिम विभाग/ पुर्व विभाग नाशिक.
19. उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक.
20. विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नाशिक.
21. प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, नाशिक.
22. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक.
23. कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग क्र.9.
24. उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक.
25. सहसंचालक, अन्न व औषध, नाशिक.
26. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक.
27. जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक.
28. उपसंचालक पर्यटन विभाग, नाशिक.
29. प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक/ मालेगांव.
30. सहायक संचालक, महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभाग, नाशिक.
31. मुख्य कार्यकारी अधिकारी, NMSCDCL.
32. मुख्याधिकारी, नगरपरिषद त्र्यंबकेश्वर.

विषय:- दिनांक 23/03/2025 रोजी सकाळी 10.00 वाजता मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली सन 2027 मध्ये नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळयाच्या तयारीच्या अनुषंगाने पुर्वचर्चा या विषया बाबत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

संदर्भ:- कार्यासन अधिकारी, नगर विकास विभाग, यांचे पत्र दि.08.07.2025.

महोदय/ महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन दिनांक 23/03/2025 रोजी सकाळी 10.00 वाजता मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली सन 2027 मध्ये नाशिक त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळयाच्या तयारीच्या अनुषंगाने पुर्वचर्चा या विषयाबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर बैठकीचे इतिवृत्त या कार्यालयास प्राप्त झालेले आहे. करिता सदरचे इतिवृत्त माहितीस्तव तथा पुढील उचित कार्यवाहीस्तव आपले कार्यालयास पाठविण्यात येत आहे.

आपली विश्वासू,

सोबत. बैठकीचे इतिवृत्त.

**Signed by Karishma Nandakumaran Nair**
**Date: 16-07-2025 13:31:02**

(करिष्मा नायर)
कुंभमेळा आयुक्त तथा सदस्य सचिव
नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
४ था मजला, (मुख्य इमारत), मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय मुंबई-४०० ०३२
Email ID : **ud२५.urban-mh@mah.gov.in**

---

क्र. बैठक-२०२५/प्र.क्र. ०७ /नवि-२५ दिनांक : ०८ जुलै, २०२५

**प्रति,**

१) विभागीय आयुक्त,नाशिक
२) जिल्हाधिकारी,नाशिक
३) आयुक्त,नाशिक महानगरपालिका
४) सर्व कार्यान्वयीन यंत्रणा (विभागीय आयुक्त,नाशिक यांच्यामार्फत)

**विषय :- दिनांक २३/०३/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली सन २०२७ मध्ये नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळयाच्या तयारीच्या अनुषंगाने पुर्वचर्चा या विषया बाबत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळयाच्या तयारीच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखालील दिनांक २३.०३.२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता शासकीय अतिथीगृह,नाशिक येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्त आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

**आपला,**

08/07/2025

(मो.क. बागवान)
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

सोबत : वरीलप्रमाणे.

**प्रत : माहितीस्तव अग्रेषित -**

१) मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे प्रशासकीय अधिकारी.
२) प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक.
३) उप सचिव (नवि-२५), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक

**दिनांक २३/०३/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली सन २०२७ मध्ये नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळयाच्या तयारीच्या अनुषंगाने पुर्वचर्चा या विषया बाबत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

---

दिनांक २३/०३/२०२५ रोजी मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली शासकीय अतिथीगृह नाशिक येथे नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा २०२७ च्या पुर्वतयारी बाबत बैठक झाली.सदर बैठकीस विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक, पोलीस महानिरिक्षक, पोलीस आयुक्त, नाशिक, जिल्हाधिकारी नाशिक,पोलीस अधिक्षक, नाशिक व आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक तसेच इतर प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

सदर बैठकीमध्ये आयुक्त नाशिक महानगरपालिका आणि जिल्हाधिकारी नाशिक यांनी त्यांच्या अधिनस्त कामांचे सादरीकरण केले.बैठकीमध्ये मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांनी पुढीलप्रमाणे निर्देशीत केले.

| अ.क्र. | मा.अध्यक्ष यांनी बैठकीत दिलेले निर्देश | संबधीत विभाग |
|---|---|---|
| ०१ | नाशिक मनपा हद्दित PPP-HAM पद्धतीवर राबविण्यात येणाऱा मलनि:सारण प्रकल्प हा सिहस्थ कुंभमेळा २०२७ च्या दृष्टीने महत्वाचा असल्याने तो दोन वर्षांत पुर्ण करणे आवश्यक आहे. सबब सदर प्रकल्पासाठी प्रसिद्ध करावयाच्या निविदा सुचनेची सर्व प्रक्रिया ही दोन आठवडयांत पुर्ण करण्यात यावी आणि एप्रिल २०२५ मध्ये सदर प्रकल्पाचे काम सुरु करावे. | नाशिक महानगरपालिका |
| ०२ | नाशिक मनपा हद्दितील सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या अनुषंगाने बांधण्यात येणारे सिंहस्थासाठी आवश्यक ११ पुलांची निविदा प्रक्रिया तातडीने सुरु करावी आणि त्यासाठी आवश्यक त्या निधीची शासनाकडे मागणी करण्यात यावी.तसेच निधिच्या उपलब्धतेनुसार प्राधान्यक्रम ठरवुन कामे सुरु करावीत. | नाशिक महानगरपालिका |
| ०३ | सिहस्थ कुंभमेळयाच्या अनुषंगाने सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन नाशिक शहरात सी.सी टिव्ही यंत्रणा उभारण्यात यावी.त्या साठी आवश्यक असलेली भुमीगत ऑप्टिकल फायबर केबल (OFC) चे जाळे हे रस्त्यांचे कामे सुरु होण्यापुर्वीच उभारण्यात यावी. | नाशिक महानगरपालिका |
| ०४ | नाशिक रोड रेल्वे स्टेशनच्या प्रवेश व्दाराची जागा सिहस्थ कुंभमेळा आणि मल्टीमोडल हब च्या नियोजनाच्या अनुषंगाने स्थलांतर करणे कामी राज्य शासनाच्या सर्व संबधीत यंत्रणांची रेल्वे विभागासोबत स्वतंत्र बैठक आयोजीत करुन त्वरीत निर्णय घ्यावा. | १.विभागीय आयुक्त, नाशिक<br>२.नाशिक महानगरपालिका |

| | | |
|---|---|---|
| ०५ | नाशिक मनपा हद्दित मुकणे येथे नव्याने तयार करावयाचे पाणी जल शुद्धीकरण केंद्राचा प्रस्ताव तातडीने नाशिक महानगरपालिकेने शासनास सादर करावा | नाशिक महानगरपालिका |
| ०६ | जिल्हाधिकारी यांनी सादर केलेल्या एकंदर सुमारे रु.१९०० कोटीच्या त्र्यंबकेश्वर धार्मिक कॉरिडॉर (दर्शन पथ व इतर) आराखडयाला तत्वतः मान्यता असुन तो त्वरीत शासनाकडे सादर करावा. | जिल्हाधिकारी, नाशिक. |
| ०७ | त्र्यंबकेश्वरला राज्यशासनाचा तीर्थक्षेत्र"अ" वर्ग दर्जा मिळेणे बाबत प्रधानसचिव, नवि-**२**, यांचे अध्यक्षतेखाली दि.२०/०२/२०२५ रोजी समितीची बैठक पार पडलेली असून सदर बैठकीमध्ये श्री श्रेत्र त्र्यंबकेश्वर तीर्थक्षेत्रास "अ" वर्ग तीर्थ क्षेत्राचा दर्जा देणेकरीता समितीने शिफारस केलेली आहे.सदर बाबत शासन अधिसूचना यथाशीघ्र निर्गमित करावी.तसेच"अ"वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव राज्यशासनामार्फत केंद्र शासनास त्वरीत सादर करावा. | १.प्रधान सचिव,नगर विकास विभाग नवि-२<br>२.जिल्हाधिकारी नाशिक |
| ०८ | सिंहस्थ कुंभमेळयाच्या वेळी वाहतुक व Parking चे नियोजन करतांना सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेच्या वापरावर भर देणे बाबत नियोजन करावे. | जिल्हाधिकारी, नाशिक |
| ०९ | त्र्यंबकेश्वर सिंहस्थकुंभमेळा २०२७ अंतर्गत हाती घेण्यात येणा-या सर्व विकासकामे ही उच्च गुणवत्तापूर्ण करण्यात यावी,याबाबत सर्व अधिका-यांनी दक्षता घ्यावी. | जिल्हाधिकारी कार्यालय<br>व<br>सर्व कार्यान्वयीन यंत्रणा |
| १० | त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ चा विचार करता सर्व कामे ही विहीत कालमर्यादेत पूर्ण करावीत. | जिल्हाधिकारी कार्यालय<br>व<br>सर्व कार्यान्वयीन यंत्रणा |
| ११ | त्र्यंबकेश्वर शहराची वैशिष्ट्यपूर्ण नैसर्गिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी बघता, तेथील उंच इमारतींबाबत आणि वास्तुकलेबाबत नियमन करण्याचा प्रस्ताव शासनास पाठवावा. | जिल्हाधिकारी नाशिक |

बैठकीत दिलेल्या सूचनांनुसार तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश देऊन मा.अध्यक्षांच्या परवानगीने बैठक समाप्त झाल्याचे जाहीर करण्यात आले.